# शाहिद सुखदेव थापा

शिव वर्मा लिहितात, "लाहोरच्या तुरुंगात उपोषण करत असताना आम्हा सर्वांना मारहाण होत होती. आम्हा सर्वांना जबरदस्तीनं दूध पाजण्याचा डॉक्टरांचा प्रयत्न होता."

"तुरुंग अधिक्षकांनी सुखदेव यांची कोठडी उघडण्यास सांगितली. कोठडी उघडताच सुखदेव बाहेर पळाले. दहा दिवसांपासून उपाशी असूनदेखील ते इतक्या वेगानं पळाले की त्यांना पकडणं कठीण झालं."

"मोठ्या प्रयत्नांनी त्यांना पकडण्यात आलं, तेव्हा सुखदेव यांनी काही शिपायांची धुलाई केली आणि काहीजणांचा दातांनी चावा घेतला. डॉक्टरकडे पाठवण्याआधी तुरुंगातील कर्मचाऱ्यांनी त्यांना खूप मारहाण केली."

"सुखदेव यांना मारहाण होऊनसुद्धा त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य कायम होतं."

वर्मा लिहितात, "पोलिसांनी जेव्हा त्यांना जबरदस्तीनं दूध पाजण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांनी पायांचा वापर करण्यास सुरुवात केली."

"जेव्हा इन्स्पेक्टर त्यांच्या अगदी जवळ गेला, तेव्हा सुखदेव यांनी कसातरी त्यांचा पाय सोडवून घेत त्या इन्स्पेक्टरला इतक्या जोरात लाथ घातली की तो काही फूट मागे जाऊन पडला. दरम्यान हे सर्व होत असताना सुखदेव सतत हसत होते."

देशाला स्वतंत्र करण्यासाठी सुखदेव यांनी खूप अत्याचार सहन केले.

आणि 23 मार्च रोजी वयाच्या 23 व्या वर्षी त्यांनी देशासाठी बलिदान दिले.